SPECIAL OFFERS
ई-पेपर वेबसाईट बनवा
फक्त २९९९/-
SAVE UP TO 90%
NEWS
9359421909
ONLY THIS WEEK!
ORDER NOW

दैनिक
# आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com

1,22,570 डिजिटल प्रतींचे दररोज सोशल मीडियाच्या माध्यमातून वितरण होणारे
पुण्यातील लोकप्रिय दैनिक

● वर्ष : ०२ ● अंक : ०६८ ● पुणे ● मंगळवार, दि. २१ जानेवारी २०२५ ● मराठी दैनिक ● पाने ४ ● किंमत : २ रूपये ● RNI No.-MAHMAR/2023/89313

VISHWANATH SPORTS MEET 2025
सातवी विश्वनाथ स्पोर्ट मिट २४ जानेवारीपासून 3



अपघातात कल्याणचे तीन जण ठार 4

## ठळक बातम्या

### अंगावरून गेल्याने चिमुकलीचा मृत्यू

मांडवगण फराटा (आरंभ पर्व) : गणेगाव दुमाला(ता. शिरूर) येथे पिकअप जीपखाली खेळणाऱ्या तीन वर्षांच्या चिमुकलीचा चाक अंगावरून गेल्याने मृत्यू झाला. ही घटना रविवारी (ता. १९) दुपारी पावणेचारच्या सुमारास घडली. याप्रकरणी शिरूर पोलिसांनी पिकअप जीपचालकावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. नेहा दीपक पवार असे मृत चिमुकलीचे नाव आहे. याबाबत दीपक सुरेश पवार (वय २४, सध्या रा. गुंडवस्ती, नानगाव, ता. दौंड, जि. पुणे, मुळ रा. कायखेड ता. धुळे) यांनी मांडवगण फराटा दूरक्षेत्रात फिर्याद दिली आहे. सुनील दत्तात्रेय खळदकर (वय ४८, रा. नानगाव गुंडवस्ती, ता. दौंड, जि. पुणे) असे गुन्हा दाखल झालेल्या जीपचालकाचे नाव आहे.

### गुन्हेगारी पुन्हा डोके वर काढतेय

आंबेठाण (आरंभ पर्व) : चाकण एमआयडीसीमधील गुन्हेगारीचे वातावरण काहीसे शांत झाले आहे, असे वाटत असताच येथील गुन्हेगारीने पुन्हा डोके वर काढले आहे. चाकण एमआयडीसी टप्पा क्रमांक दोनमधील वराळे (ता. खेड) येथील एका कंपनीमालकावर आज अज्ञातांनी गोळीबार करून जीवे मारण्याचा प्रयत्न केला. यामुळे एमआयडीसीमधील कंपनी मालक, गुंतवणूकदार आणि उद्योजकांचे धाबे दणाणले असून गुन्हेगारांवर वचक बसविण्याची मागणी केली जात आहे. खेड तालुक्यात एमआयडीसीचे चार टप्पे पूर्ण झाले असून, पाचव्या टप्प्याची भूसंपादन प्रक्रिया सुरू आहे. याशिवाय डब्लूएमडीसीअंतर्गतही कारखाने सुरू आहे. २०२३ पर्यंत चाकण पोलिस ठाण्याच्या माध्यमातून एमआयडीसी भागात सुरक्षा पुरविली जात होती. एमआयडीसीचे मोठे क्षेत्र पाहता पोलिसांचे संख्याबळ अपुरे ठरत होते. त्यामुळे २०२३ला म्हाळुंगे एमआयडीसी या नविन पोलिस ठाण्याची निर्माती करण्यात आली. त्यानंतर क्षेत्र विभागले गेल्याने आणि पुरेसे पोलिस बळ उपलब्ध झाल्याने एमआयडीसी भागातील गुन्हेगारी काही प्रमाणात रोखली गेली. परंतु ती पूर्ण थांबली नाही, हे यापूर्वीच्या आणि आजच्या घटनेवरून दिसत आहे. एमआयडीसी भागात उद्योजकांना धमकाविणे, खंडणी मागणे, वाहने अडवून दादागिरी करणे, राजकीय दबाव टाकत ठेके मिळविणे असे अनेक प्रकार आजवर सुरूच आहेत. चाकण पोलिस ठाण्यांतर्गत ही सर्व एमआयडीसी असताना गुन्हेगारीचे प्रमाण मोठे होते, पण म्हाळुंगे येथे एमआयडीसीसाठी स्वतंत्र पोलिस ठाणे झाल्यानंतर गुन्हेगारीचे प्रमाण कमी कमी झाले होते.

### हॉटेलमध्ये तोडफोड

पुणे (आरंभ पर्व) : कारागृहातून जामिनावर बाहेर आलेल्या सराईत गुन्हेगार आणि त्याच्या साथीदारांनी हॉटेलमालकासह व्यवस्थापकास मारहाण करून खंडणीची मागणी केली. ही घटना धानोरी जकात नाका परिसरात घडली. याप्रकरणी महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायद्यान्वये (मकोका) दाखल गुन्ह्यातील गुन्हेगारासह आठ जणांविरुद्ध विमानतळ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

# बोपदेव घाट परिसरात दहशत माजविणाऱ्या सातजणांना अटक

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

बोपदेव घाट परिसरात तरुणावर कोयत्याने वार करून दहशत माजविणाऱ्या सात आरोपींना कोंढवा पोलिसांनी अटक केली. त्यांच्याकडून चार धारदार शस्त्रे आणि वाहने असा सुमारे तीन लाख ८० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, बोपदेव घाट परिसरातील ट्रिनिटी महाविद्यालयासमोर रस्त्यावर १६ जानेवारी रोजी दुपारी काही तरुणांमध्ये भांडण झाले होते. त्यात आरोपींनी विश्वजित बाबाजी हुलवळे (वय १९, रा. येवलेवाडी) याच्यावर कोयत्याने वार करून गंभीर जखमी केले होते.



याबाबत खुनाचा प्रयत्न केल्याप्रकरणी कोंढवा पोलिसांनी गुन्हा दाखल केला होता. आरोपींचा शोध घेताना पोलिस हवालदार सतीश चव्हाण आणि विशाल मेमाणे यांना आरोपी राज रोंगे हा येवलेवाडीतील सदनिकेत लपल्याची माहिती मिळाली. त्यानुसार पोलिसांनी तपास करून सात आरोपींना अटक केली.

भावेश बाळासाहेब कुंजीर (वय २३, रा. सासवड), अथर्व कैलास पवार (वय २१, रा. बी.टी. कवडे रस्ता, घोरपडी), सूरज सचिन राऊत (वय २१, रा. येवलेवाडी), आर्यन विलास पवार (वय १८, रा. घोरपडी), सौरभ प्रदीप लोंढे (वय १८, रा. धनकवडी), राज दिगंबर रोंगे (वय १९, रा. येवलेवाडी), वरुण बबन भोसले (वय २१, रा. जेजुरी, ता. पुरंदर) अशी अटक केलेल्यांची नावे आहेत. न्यायालयाने आरोपींना पोलिस कोठडी सुनावली आहे.

ही कारवाई अतिरिक्त पोलिस आयुक्त मनोज पाटील, पोलिस उपायुक्त डॉ. राजकुमार शिंदे, सहाय्यक आयुक्त धन्यकुमार गोडसे, वरिष्ठ निरीक्षक विनय पाटणकर, पोलिस निरीक्षक (गुन्हे) अब्दुल रौफ शेख, सूरज बेंद्रे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उपनिरीक्षक बालाजी डिगोळे, पोलिस हवालदार अमोल हिरवे, सतीश चव्हाण, नीलेश देसाई, विशाल मेमाणे, गोरखनाथ चिनके, पोलिस अंमलदार संतोष बनसोडे, लक्ष्मण होळकर, शाहीद शेख, सूरज शुक्ला, सागर भोसले, सुजित मदन, राहुल थोरात यांच्या पथकाने केली.

## इंदापूर शहरातून दोन म्हशी चोरीला

**इंदापूर(दै. आरंभ पर्व)**

शहरातील व्यंकटेश नगर परिसरात रात्रीच्या अंधाराचा फायदा घेऊन दारासमोर बांधलेल्या दोन म्हशी चोरून नेल्याची घटना घडली. या प्रकरणी इंदापूर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

याबाबत श्याम हिरा सूर्यवंशी यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार बुधवारी (ता. १५) रात्री दहा वाजता व्यंकटेशनगर येथे घरासमोर बांधलेल्या दोन्ही म्हशीला फिर्यादीने चारापाणी केला. मात्र, त्यानंतर गुरुवारी पहाटे पाच वाजता जनावरांना चारा पाणी व साफसफाई करण्यासाठी पाहिले असता बांधलेल्या ठिकाणी म्हशी दिसून आल्या नाहीत. घराच्या आजूबाजूला परिसरात म्हशी सुटून गेले आहेत ही काय, हे पाहण्यासाठी त्यांनी व पत्नी सोनाली यांनी शहर व परिसरात




जाऊन शोध घेतला, मात्र त्या आढळून आल्या नाहीत. यावरून एक तांबूस रंगाची अर्ध शेपूट तुटलेली चार वर्षे वयाची जाफराबादी मुऱ्हा व दुसरी काळ्या रंगाची चार वर्षांची अशा दोन्हीही गाभण म्हशी चोरीला गेल्याचे स्पष्ट झाले. याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## मुंढव्यातील हुक्का पार्लरवर गुन्हे शाखेची कारवाई

### हॉटेल मालकासह व्यवस्थापकाविरुद्ध गुन्हा दाखल

**मुंढवा(दै. आरंभ पर्व)**

मुंढवा येथील एका हॉटेलमध्ये सुरू असलेल्या हुक्का पार्लरवर पोलिसांनी छापा टाकत कारवाई केली. या कारवाईमध्ये पोलिसांनी हुक्का पात्र तसेच सुगंधी तंबाखू असा मुद्देमाल जप्त केला आहे.

याप्रकरणी हॉटेल मालक आणि व्यवस्थापकाविरुद्ध मुंढवा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, गुन्हे शाखेच्या युनिट पाचचे पथक मुंढव्यात गस्त घालत होते, या परिसरातील एका हॉटेलात बेकायदा हुक्का पार्लर सुरू असल्याची माहिती पोलीस कर्मचारी तानाजी देशमुख



यांना एका बातमीदाराकडून मिळाली. मिळालेल्या महितीनुसार पोलिसांनी या हॉटेलमध्ये छापा टाकत कारवाई केली. या हॉटेलमध्ये हुक्का पार्लर सुरू असल्याचे उघडकीस आले. पोलिसांनी या हॉटेलमधून हुक्का पात्र, सुगंधी तंबाखू असा सात हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

याप्रकरणी हॉटेल मालक आणि व्यवस्थापकाविरुद्ध सिगारेट आणि तंबाखूजन्य उत्पादने (महाराष्ट्र सुधारणा) सन १९१८ कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला.

ही कारवाई पोलीस आयुक्त शैलेश बलकवडे, उपायुक्त निखील पिंगळे, सहायक आयुक्त राजेंद्र मुळीक यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक युवराज हांडे, सहायक निरीक्षक विजयकुमार शिंदे, पोलीस कर्मचारी तानाजी देशमुख, प्रमोद टिळेकर, पृथ्वीराज पांडुळे, शुभांगी म्हाळशीकर, संजयकुमार दळवी यांनी केली.

दैनिक आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com
WE ARE HIRING !
Open Position
VIDEO EDITOR
आपला बायोडाटा खालील ईमेलवर पाठवावा.
for Video Editor असा स्पष्ट उल्लेख करावा.
aparvinfo@gmail.com & ganganepratik4@gmail.com
Call Now ७२७६३१४१४२

दैनिक आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
वार्ताहर नेमणे आहे
पुणे आणि जिल्ह्यात लोकप्रिय दै.आरंभ पर्वसाठी खालीलप्रमाणे जिल्हा व तालुकास्तरावर वार्ताहर नेमणे आहेत.
सिंहगड रोड भागातील जनतेचा आवाज.. इथं आहे जनहिताचे सर्व आरंभपर्व
पुणे जिल्हा: इंदापूर शहर, इंदापूर ग्रामीण, बारामती, उरुळी कांचन, यवत, केडगाव, सुपा, भिगवण, सासवड, पुरंदर,जेजुरी, नीरा, सोमेश्वर, माळेगाव, भोर, वेल्हा. चाकण, राजगुरूनगर, मंचर, जुन्नर, घोडेगाव, लोणी काळभोर
पुणे शहर: धायरी, स्वारगेट, हडपसर, कॅम्प, वडगाव बुद्रुक, पर्वती, डेक्कन, सिंहगड रोड, कात्रज, कोंढवा
इच्छुकांनी आपला बायोडाटा खालील ई-मेल वर पाठवावा.
aparvinfo@gmail.com
वार्ताहरांना मिळणाऱ्या सुविधा
आयडीकार्ड, नियुक्तीपत्र, युट्युबसाठी लागणारा माईक
(टीप - वरील गोष्टी देण्यापूर्वी किमान एक महिने काम करणे आवश्यक. आपले काम बघून पुढील निर्णय घेतला जाईल.)
दै.आरंभपर्व मीडिया समूह 7276314142 / 9284559577 / 8605284272

# महिलांच्या आरोग्याच्या समस्यांचा उलगडा



***महिलांचे आरोग्य सुधारण्यासाठी सुलभतर्फे नुकताच भारतातील मासिक पाळी स्वच्छता व्यवस्थापन व्यापक अहवाल प्रकाशित करण्यात आला. यात मासिक पाळी येण्यापासून मासिक पाळी जाईपर्यंत मूल होणे किंवा न होणे यासारख्या मुद्द्यांपर्यंत अनेकवेळा स्त्रीला दुजाभाव सहन करावा लागतो आणि म्हणूनच आरोग्य आणि महिलांचा जवळचा संबंध आहे हे सिद्ध करणारा हा संशोधन अभ्यास भारतातील १४ जिल्ह्यांमधील २० ते ४९ वयोगटातील मासिक पाळी येणाऱ्या महिलांच्या माहितीवर आधारित आहे.***

शोधकांनी प्रामुख्याने मध्यमवर्गीय महिलांच्या मासिक पाळी संबंधी समस्यांवर लक्ष केंद्रित केले तसेच तरुण महिलांच्या समस्यांवरील यात समावेश केला गेला. या संशोधन अहवालात मासिक पाळीसंबंधी समस्यांमुळे महिलांना येणाऱ्या अडचणींचा उलगडा केला गेला. मासिक पाळी दरम्यान कामासाठी स्थलांतर करणाऱ्या महिलांना जसे की उसाच्या शेतामध्ये, वीटभट्ट्यांमध्ये खाणींमध्ये आणि कारखान्यांमध्ये काम करणाऱ्या महिलांना सामोरे जावे लागणाऱ्या आव्हानांना अधोरेखित करण्यात आले. महिलांच्या आरोग्यावर परिणाम करणारे समस्यांचा बहुपक्षिय स्वरूपाचा उलगडा या अहवालात करण्यात आला आहे. यामध्ये मासिक पाळीसाठी लागणाऱ्या स्वच्छता उत्पादनांची माफक दरात उपलब्धता पाणी स्वच्छता संबंधित पायाभूत सुविधांचा अभाव यांचा समावेश होता.

सार्वजनिक योजनांची वितरण व्यवस्था मासिक पाळी बद्दलच्या सामाजिक विरोधी चुकीच्या समजूती आणि आरोग्य शिक्षणाची गरज यावर देखील यावर प्रकाश टाकण्यात आला. त्याचबरोबर महिलांचे आरोग्यावर परिणाम करणारे इतर विविध घटक प्रामुख्याने नमूद होते. या अहवालाचा उद्देश पुराव्यावर आधारित माहितीचा वापर करून विद्यमान धोरणे अधिक सक्षम करणे किंवा नवीन धोरणांसाठी मार्गदर्शन करणे हा होता. राज्यातील बीड आणि धाराशिव जिल्हा प्रामुख्याने स्थलांतरितांचा व दुष्काळी प्रदेश मानला जातो या जिल्ह्यांमधील मुलाखतींवर आधारित महाराष्ट्र विषय एका भागात महिलांमधील जैविक जागृतीचा अभाव मासिक पाळी संबंधी आरोग्य धोक्यांबाबत अज्ञान तसेच सामाजिक रूढी आणि गैरसमजांमुळे मासिक पाळीच्या स्वच्छतेविषयी चर्चा करण्यास महिलांना येणारे अडथळे अधोरेखित करण्यात आले आहे. स्थलांतरित महिला कामगारांमध्ये गर्भाशय काढून टाकण्याच्या समस्यांवरील विस्तृत चर्चा करण्यात आली आहे. या अहवालानुसार मासिक पाळी दरम्यान शाळेतील शौचालयांच्या निकृष्ट सुविधांमुळे मुलींना त्याचा वापर करण्याची भीती वाटते त्यामुळे मासिक पाळी दरम्यान शाळेत मुलींची गैरहजेरी वाढते.



बीडमधील सर्वेक्षण केलेल्या १९.१% महिलांना मासिक पाळीशी कोणते अवयव संबंधित आहेत हे माहीतच नव्हते तर २६.५ महिलांना मासिक पाळीची कारणे माहीत नव्हती तर २४.५% महिला आणि धाराशिवमधील १६.८% महिला मासिक पाळीच्या त्याच्या दुष्परिणाम काय आहेत ते सांगू शकले नाहीत मासिक पाळीच्या स्वच्छतेच्या पद्धती बीड मधील ७०.३% आणि धाराशिवमधील ६६.२% महिला कापड व्यतिरिक्त मासिक पाळीच्या उत्पादनांचा वापर करतात ६५.२% महिलांनी खर्च वाचवण्यासाठी कापडासोबत सॅनिटरी पॅड वापरले ते सांगितले. बीडमध्ये मासिक पाळीच्या उत्पादनांवर सरासरी खर्च करण्याची क्षमता धर्मा २७ रुपये होती आणि धाराशिवमध्ये ५७ रुपये होती दोन्ही जिल्ह्यांमध्ये जवळजवळ अर्ध्या महिलांनी मासिक पाळीच्या वेळी स्वच्छ सुती कापड वापरण्याचे सांगितले. त्यापैकी ६२.२% महिलांनी कापड पुन्हा वापरल्याचे सांगितले हे कापड बाथरूममध्ये किंवा विहिरी किंवा पंपाजवळ धुतले जाते. दोन्ही जिल्ह्यांमध्ये ४७% महिलांनी एकत्रितपणे प्रत्येकवेळी साबण वापरला, तर ५०% महिलांनी साबणाचा विसंगत वापर केला. ८३.७ महिलांनी मासिक पाळीचे कपडे लपलेल्या ठिकाणी वाळवले.फक्त अर्ध्या महिलांनी वापरण्यापूर्वी कापड पूर्णपणे कोरडे असल्याची खात्री केली. ९१.७% मध्यमवर्गीय महिलांनी सांगितले की, महिला डॉक्टरांच्या अभावामुळे त्यांनी मासिक पाळीशी संबंधित आरोग्य समस्यांसाठी वैद्यकीय सल्ला घेण्याचे टाळले. मासिक पाळीच्या आरोग्याच्या गंभीर समस्या असूनही बीडमधील फक्त १४.३% महिलांना वैद्यकीय सल्ला घेतल्याचे सांगितले. प्रत्यक्षात फक्त ७.१ महिलांनी डॉक्टरांना भेट दिली आणि उपचार घेतले.

धाराशिवमधील ७०.४ महिलांनी डॉक्टर खूप दूर असल्याचे कारण सांगितले. जिल्ह्यातील १४.८ महिलांनी सांगितले की त्यांच्याकडे डॉक्टरकडे जाण्यासाठी पैसे नाहीत. महिला डॉक्टर नसल्यामुळे दोन्ही जिल्ह्यांमध्ये ४४.९ महिलांनी मासिक पाळीच्या आरोग्याच्या समस्यांबाबत वैद्यकीय सल्ला घेण्याचे टाळले ५७७ पैकी ६६ महिलांनी गर्भाशय काढण्याचे ऑपरेशन केल्याचे सांगितले. ६६ पैकी फक्त चार गर्भाशय शस्त्रक्रिया सरकारी रुग्णालयांमध्ये करण्यात आल्या. गर्भाशय काढण्याचे ऑपरेशन झालेल्या तीन महिलांनी सांगितले की कमी सहनशक्ती आणि पुरेशा स्वच्छता सुविधेच्या अभावामुळे घराबाहेर काम करताना अडथळा ठरते. या अहवालातील विशेष नमूद केलेल्या गोष्टी म्हणजे महाराष्ट्रातील ५७७ पैकी ३७३ महिला या कच्च्या घरात राहतात. बीडमधील ३५१ पैकी ७३ महिला या पक्क्या घरात राहतात. धाराशिवमध्ये २२६ पैकी फक्त सहाजणांना पक्की घर परवडतात आणि पक्क्या घरांमध्ये शौचालय बांधता येतात.

कच्च्या घरांमध्ये शौचालय बांधता येत नाही. ५७७ पैकी ५२९ महिलांनी पाईपलाईन हा त्यांचा प्राथमिक पाण्याचा स्त्रोत असल्याचे सांगितले तसेच बीड आणि धाराशिवमध्ये अनेकदा दुष्काळांची दुष्काळासारख्या परिस्थिती आणि तीव्र पाण्याच्या टंचाईचा सामना करावा लागतो. त्यामुळे गावांना टँकरद्वारे पिण्याचे पाणी पुरवले जाते अशा परिस्थितीत महिलांना मासिक पाळीच्या स्वच्छतेसाठी अतिरिक्त अडचणींना तोंड द्यावे लागते. ५७७ महिलांनी फक्त २८६ जणांनी सातवीपर्यंत शाळा शिकली होती. बहुतेकदा मासिक पाळीच्या वेळी किंवा त्यापूर्वी शाळा सोडली जाते. हा फक्त दोन जिल्ह्यांपुरता विचार झाला. अशी असंख्य धक्कादायक निष्कर्ष या अहवालात आहेत. आपण आपला महाराष्ट्र कितीही प्रगत मानला तरी ग्रामीण भागातील अवस्था अत्यंत बिकट आहे. ग्रामीण भागातील काही भयानक रूढी त्यात महिलांच्या शिक्षणाबाबत होणारे दुर्लक्ष.

महिलांना आजही उपभोग्य समजले जाणारे विचार त्यामुळे संपूर्ण समाजाचा महिलेकडे बघण्याचा दृष्टिकोन यामुळे महिलांच्या प्रगतीकडे हवे तितके लक्ष दिले जात नाही.

अजूनही ग्रामीण भागातील विभागांकडे सरकारी यंत्रणा पोहोचवून महिलांना साक्षर करून प्रगत करणे खूप आवश्यक बनले आहे. या अहवालात त्या त्रुटींबाबत व उपाय सुचवण्यात आले आहेत. त्याचा चांगला वापर करून सरकारने या अहवालावर अभ्यास करून त्वरित कार्यवाही करणे महिलांच्या आरोग्यबाबतीत तसेच येणाऱ्या पिढीसाठी आवश्यक ठरणार आहे.

## एमआयटी डब्ल्यूपीयूला राष्ट्रीय मानांकन मिळाले



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

कौशल्य आणि दृढनिश्चय दाखवत एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीचे खेळाडू तनिषा कोटेचा, प्रिती वर्टिकर आणि सायली वाणी यांनी वडोदरा येथे संपन्न झालेल्या प्रतिष्ठि युवा राष्ट्रीय टेबल टेनिस अजिंक्यपदाच्या १९ वर्षाखालील गटात पहिले, दुसरे आणि तिसरे स्थान पटकावले आहे. या खेळाडूंनी आपले कौशल्य उत्तम प्रकारे दाखवून हे पुरस्कार जिंकले आहेत. या विजयाबद्दल एमआयटी डब्ल्यूपीयूचे कार्यकारी अध्यक्ष राहुल विश्वनाथ कराड यांनी शुभेच्छा देऊन अभिनंदन केले.

अथक समर्पण, लवचिकता आणि उत्कृष्टतेसाठी वचनबद्धता दाखवत तनिषा कोटेचाने तिच्या स्पर्धकांना मार्ग टाकत १९ वर्षाखालील दुहेरीत सुवर्णपदक, सांघिक गटात रौप्यपदक आणि १९ वर्षाखालील एकेरीत कांस्यपदक जिंकले. प्रीती वर्टीकरने १९ वर्षाखालील दुहेरी आणि सांघिक प्रकारात दोन रौप्य पदके जिंकली तर सायली वाणीने १९ वर्षाखालील दुहेरी प्रकारात सुवर्ण आणि सांघिक प्रकारात रौप्य पदके जिंकली. या विजयाबद्दल एमआयटी डब्ल्यूपीयूचे कार्यकारी अध्यक्ष राहुल विश्वनाथ कराड म्हणाले की ही विद्यापीठासाठी खूप अभिमानाची गोष्ट आहे.

विद्यार्थ्यांचे यश त्यांची प्रतिभा आणि कठोर परिश्रम तसेच विद्यापीठाच्या व्यापक समर्थन प्रणालीचे देखील प्रतिबिंब आहे. क्रीडा क्षेत्रातील उत्कृष्टतेसह शैक्षणिक उत्कृष्टतेला प्रोत्साहन देणारे वातावरण प्रदान करण्यासाठी आम्ही वचनबद्ध आहोत. या खेळाडूंना रोहित बागवडे यांनी मार्गदर्शन केले.

## म्हाळुंगेत स्टील कंपनीतील व्यवस्थापकावर गोळीबार

**पिंपरी (दै. आरंभ पर्व)**

म्हाळुंगे पोलीस ठाण्याच्या हद्दीत एका स्टील कंपनीतील व्यवस्थापकावर दुचाकीवरून आलेल्या दोन हल्लेखोरांनी गोळीबार केल्याची घटना सोमवारी वराळे येथे घडली. हल्ल्याचे नेमके कारण समजू शकले नाही. अजय विक्रम सिंग (वय ३४, रा. हिंजवडी, मूळ – उत्तर प्रदेश) असे जखमी व्यवस्थापकाचे नाव आहे. याबाबत कंपनीचे सुपरवायझर यांनी म्हाळुंगे एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सिंग हे मागील काही वर्षांपासून म्हाळुंगे येथील कैलास स्टील कंपनीत व्यवस्थापक म्हणून काम करतात. सोमवारी सकाळी पावणेअकराच्या सुमारास ते कंपनीच्या आवारात असताना काळ्या रंगाच्या दुचाकीवरून हेल्मेट घातलेले दोन हल्लेखोर कंपनीच्या आवारात आले. त्यांनी सिंग यांच्यावर पिस्तुलातून दोन गोळ्या झाडल्या आणि वराळे- भांबोली गावच्या दिशेने पळून गेले. या हल्ल्यामध्ये सिंग यांच्या पोटात आणि कमरेच्या खाली गोळ्या लागल्याने ते गंभीर जखमी झाले आहेत.




## पाषाणकर ऑटो ग्राहकांचे हित जपण्यात अग्रेसर

**पुणे : लक्ष्मण साबळे (दै. आरंभ पर्व)**

**● पाषाणकर ऑटो शिवाजीनगर येथे होंडा एक्टिवा 125 आणि एसपी 125 नवीन मॉडेल खरेदीसाठी उपलब्ध**

अलीकडे होंडाने ॲक्टिवा 125 आणि होंडा एसपी 125 चे अपडेटेड दोन मॉडेल भारतीय बाजारात लॉन्च केले आहे. होंडाच्या नवीन वैशिष्ट्यांसह, नवीन डिझाइन देण्यात आले आहे. 18जानेवारी रोजी जंगली महाराज रोड येथील पाषाणकर ऑटो येथे होंडाच्या दोन्ही टू व्हीलर ग्राहकांना खरेदीसाठी उपलब्ध करून देण्यात आले आहेत. त्याचं अनावरण देखील करण्यात आलं.

याप्रसंगी पाषाणकर ऑटो चे कार्यकारी संचालक सूरज गिरमे, सेल्स हेड प्रवीण रहाटे, अकाउंट रवी गारगोटे, रवी जगधने तसेच सर्विसनेटवर्क टीम तसेच पाषाणकर होंडा बिगविंग पुणे ईस्टचे व्यवस्थापक संतोष कुंडगिर, सेल्स हेड राकेश स्वामी तसेच होंडा इंडिया पुणे विभागाचे इन्चार्ज, पाषाणकर ऑटो टीम आदी उपस्थित होते.

होंडा अक्टिवा 125 बाबत अधिक माहिती अशी की, डिझाइन पूर्वीपेक्षा अधिक आकर्षक बनले आहे. यासह, नवीन 4.2 इंच TFT स्मार्ट स्क्रीन या शिवाय ब्लूटूथ स्मार्टफोन कनेक्टिव्हिटीची सुविधा देखील आहे, जी तुम्ही होंडा रोड सिंक ॲपद्वारे वापरू शकता. यासह कॉल आणि एसएमएस अलर्ट नेव्हिगेशन आणि म्युझिक कंट्रोल. सी टाईप चार्जिंग पोर्ट आणि अडवान्स आय एस आय सिस्टीम नी सुसज्जित आहे.

होंडा एसपी 125 बद्दल अधिक माहिती अशी की, नविन हेडलॅम्प व आकर्षक ग्राफिक्स यासह ब्लूटूथ कनेक्टिव्हिटी 4.2-इंचाचा TFT डिस्प्ले, नवीन स्क्रीन सेटअप होंडा रोड सिंक ॲप सुसंगततेसह येतो, जे वापरकर्त्यांना स्मार्ट राइडसाठी नेव्हिगेशन आणि व्हॉइस कॉल साठी मदत करतो.

यासोबत यूएसबी टाईप-सी चार्जिंग पोर्ट आणि आयडलिंग स्टॉप सिस्टमसह सुसज्जीत आहे.

## थोडक्यात



### चिकुनगुनियाच्या धोक्यात वाढ; राज्यभरात रुग्णसंख्येत दुपटीने वाढ

**पुणे (आरंभ पर्व) : राज्यात कीटकजन्य आजारांचा प्रादुर्भाव वाढला आहे. गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदा पहिल्या पंधरवड्यात चिकुनगुनियाच्या रुग्णसंख्येत जवळपास दुपटीने वाढ झाली आहे. याच वेळी हिवताप आणि डेंग्यूच्या रुग्णसंख्येत गेल्या वर्षीच्या तुलनेत घट झाली आहे. राज्यात यंदा १ ते १६ जानेवारीदरम्यान चिकुनगुनियाचे १३० रुग्ण आढळून आले आहेत. गेल्या वर्षी याच कालावधीत चिकुनगुनियाचे ७७ रुग्ण आढळले होते. त्याच वेळी हिवतापाचे यंदा ४०१ रुग्ण आढळून आले असून, गेल्या वर्षी याच कालावधीत ही रुग्णसंख्या ५७२ होती. डेंग्यूची रुग्णसंख्या पहिल्या पंधरवड्यात २१० असून, गेल्या वर्षी ती ४२६ होती. गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदा चिकुनगुनियाचे रुग्ण मोठ्या प्रमाणात वाढले आहेत. याच वेळी डेंग्यूची रुग्णसंख्या कमी झाली आहे. कीटकजन्य आजारांमुळे यंदा राज्यात अद्यापपर्यंत एकही मृत्यू झालेला नसल्याचे आरोग्य विभागाच्या ताज्या अहवालातून समोर आले आहे. राज्यात पहिल्या पंधरवड्यात चिकुनगुनियाचे सर्वाधिक २० रुग्ण अकोला महापालिकेत आढळले असून, बृहन्मुंबई महापालिका १९, सातारा जिल्हा १७, अकोला जिल्हा १५ अशी रुग्णसंख्या आहे.**

# "नोकरदार वर्ग आणि गाडी खरेदी : सोय की भार?"

**(दै. आरंभ पर्व)**

***आजच्या आधुनिक जीवनशैलीत चारचाकी गाडी अनेकांसाठी गरजेची वस्तू झाली आहे. मात्र, ती नेहमीच गरज म्हणून घेतली जाते का, की ती एक प्रतिष्ठेचे प्रतीक आहे, याचा विचार करणे महत्त्वाचे आहे. नोकरदार वर्गासाठी गाडी घेतल्यामुळे काही फायदे होतात, तर काही तोटेही होतात. या लेखात आपण चारचाकी गाडीची आवश्यकता, तिच्या फायद्या-तोट्यांचा सखोल अभ्यास, पर्यावरणीय परिणाम, तसेच पर्यायांचा विचार करू.***



चारचाकी गाडी खरेदी करण्याचे फायदे

**1. सोय आणि सुविधा**

चारचाकी गाडी असल्यामुळे व्यक्तीला स्वतःच्या वेळेचे नियोजन करता येते. खासकरून लांब अंतराच्या प्रवासात सार्वजनिक वाहतूक वेळखाऊ ठरते. गाडीमुळे कार्यालय, शाळा, आणि कुटुंबाच्या आवश्यक गोष्टी सहज पूर्ण होतात.

उदाहरण: मुंबई-पुण्यासारख्या ठिकाणी प्रवास करताना गाडीचा उपयोग वेळ आणि मेहनत वाचवतो.

**2. कुटुंबासाठी उपयोगी**

कुटुंबातील सर्व सदस्यांसाठी एकाच वेळी प्रवास करणे सोपे होते. लहान मुले, वयोवृद्ध व्यक्ती किंवा आजारी कुटुंबीयांसाठी गाडी ही मोठी गरज ठरते.

उदाहरण: सहलींना किंवा बाहेरगावी जाताना गाडी ही सार्वजनिक वाहतुकीपेक्षा अधिक सोयीची ठरते.

**3. आपत्कालीन परिस्थितीत उपयुक्तता**

आरोग्यदृष्ट्या किंवा अन्य कोणत्याही आपत्कालीन परिस्थितीत गाडी हा एक विश्वासार्ह पर्याय असतो.

उदाहरण: मध्यरात्री वैद्यकीय मदतीसाठी गाडी नसल्यास मोठी समस्या निर्माण होऊ शकते.

**4. सुरक्षितता आणि गोपनीयता**

सार्वजनिक वाहतुकीत अनेकदा गोंधळ किंवा अस्वस्थता जाणवते. याउलट, गाडी तुमच्या गरजेनुसार आणि वेळेनुसार वापरता येते.

उदाहरण: कामाच्या ठिकाणी जाण्याच्या प्रवासात गाडीत फोन कॉल्स किंवा महत्त्वाच्या गोष्टी हाताळणे शक्य होते.

**5. प्रतिष्ठा आणि आनंद**

गाडी असणे हे अनेकांसाठी सामाजिक प्रतिष्ठेचे प्रतीक आहे. नवीन गाडी खरेदी करण्याचा आनंद काहीसा स्वप्नपूर्ती सारखा वाटतो.

**6. प्रवासाचा आनंद आणि स्वातंत्र्य**

गाडीमुळे स्वतंत्र प्रवासाचा आनंद घेता येतो. कोणतीही वेळ किंवा ठिकाण निश्चित नसल्याने, सहज योजना आखता येते.

उदाहरण: वीकेंडला कुटुंबासोबत जवळच्या ठिकाणी सहल करणे.

चारचाकी गाडी खरेदी करण्याचे तोटे

**1. उच्च किंमत आणि आर्थिक भार**

गाडी खरेदी करणे हे मोठे आर्थिक आव्हान असते. गाडीची मूळ किंमत, कर्जाचा हप्ता, विमा, इंधन, आणि देखभाल याचा ताण नोकरदार व्यक्तींवर येतो.

उदाहरण: ₹10 लाखांची गाडी घेतल्यानंतर दरमहा ₹15,000-₹20,000 पर्यंतचा अतिरिक्त खर्च होतो.

**2. जलद किंमत घसरते (Depreciation)**

गाडी ही चांगल्या किंमतीत विकणे कठीण असते. काही वर्षांत तिच्या मूळ किमतीतून मोठी घट होते.

उदाहरण: गाडी घेतल्यानंतर पहिल्या 3 वर्षांत ती 30-40% कमी किमतीला विकली जाते.

**3. वाहतुकीच्या समस्या कायम राहतात**

गाडीने प्रवास करण्यासाठी ट्रॅफिक जॅम मोठी समस्या ठरते. त्यामुळे वेळ वाया जातो.

उदाहरण: मुंबई किंवा बेंगळुरूसारख्या शहरांमध्ये गाड्यांच्या रांगा दररोज कामाच्या वेळा लांबवतात.

**4. पर्यावरणीय परिणाम**

गाड्यांमुळे मोठ्या प्रमाणावर इंधन जळते आणि कार्बन उत्सर्जन होते. पर्यावरणासाठी हा मोठा धोका आहे.

उदाहरण: भारतातील मोठ्या शहरांमध्ये प्रदूषण पातळी वाढण्याचे एक प्रमुख कारण गाड्या आहेत.

**5. पार्किंगची समस्या**

शहरांमध्ये गाडी पार्क करण्यासाठी जागा शोधणे आणि त्यासाठीचा खर्च हा एक मोठा त्रास असतो.

उदाहरण: पुण्यातील काही भागांत पार्किंगसाठी दरमहा ₹2,000-₹3,000 भरावे लागते.

**6. आरोग्यावर होणारा परिणाम**

गाडीच्या जास्त वापरामुळे शारीरिक हालचाली कमी होतात, जे दीर्घकाळ आरोग्यासाठी हानिकारक ठरते.

उदाहरण: चालण्याऐवजी गाडी वापरण्यामुळे लठ्ठपणा आणि इतर आजार वाढण्याचा धोका असतो.

नोकरदार वर्गाने गाडी घेताना विचार करण्यासारख्या गोष्टी:

गाडी घ्यावी, जर:

1. **तुम्ही अशा ठिकाणी राहत असाल, जिथे सार्वजनिक वाहतूक अपुरी किंवा वेळखाऊ आहे.**
2. **तुमच्या ऑफिस आणि घरातील अंतर खूप लांब असेल.**
3. **तुमच्या कुटुंबात लहान मुले किंवा वयोवृद्ध सदस्य असतील, ज्यांना प्रवास सोपा हवा असेल.**
4. **आपत्कालीन परिस्थिती हाताळण्यासाठी स्वतःची गाडी उपयुक्त वाटत असेल.**

गाडी घेऊ नये, जर:

1. **तुम्ही शहराच्या मध्यभागी राहत असाल आणि ऑफिस जवळ असेल.**
2. **सार्वजनिक वाहतूक सोयीची, स्वस्त, आणि वेळेवर उपलब्ध असेल.**
3. **तुम्हाला पर्यावरण संरक्षणासाठी योगदान द्यायचे असेल.**
4. **गाडी खरेदी आणि तिच्या देखभालीचा खर्च तुमच्या मासिक बजेटवर परिणाम करणार असेल.**

पर्यायांवर विचार

पर्यावरणीय जबाबदारी

गाड्यांमुळे होणारे प्रदूषण हे हवामान बदलाचे एक मुख्य कारण आहे. चारचाकी गाड्या खरेदी करताना खालील पर्यावरणीय गोष्टी लक्षात घ्याव्यात:

1. **कार्बन उत्सर्जन कमी करणाऱ्या गाड्या निवडाव्यात.**
2. **शक्य असल्यास सौरऊर्जेवर चालणाऱ्या गाड्यांवर विचार करावा.**
3. **सार्वजनिक वाहतूक अधिकाधिक वापरण्यावर भर द्यावा.**

अभ्यासानुसार आर्थिक परिणाम

गाडीच्या खर्चाचे गणित:

प्रारंभिक खर्च: ₹10-15 लाख (गाडीची किंमत)

विमा: दरवर्षी ₹30,000-₹50,000

इंधन खर्च: दरमहा ₹5,000-₹10,000

देखभाल खर्च: दरवर्षी ₹10,000-₹20,000

पार्किंग शुल्क: ₹2,000-₹3,000 (महिना)

गाडी नसल्यास बचत:

जर गाडी खरेदी न करता सार्वजनिक वाहतूक वापरली, तर दरवर्षी किमान ₹1.5-₹2 लाखांची बचत होऊ शकते.

**लेखक : प्रा.योगेश हांडगे, सहाय्यक प्राध्यापक संगणक विभाग, पुणे इन्स्टिटयूट ऑफ कॉम्पुटर टेकनॉलॉजी.**

### गाडी खरेदी न करता खालील पर्यायांचा विचार करता येतो

1. **पब्लिक ट्रान्सपोर्ट (सार्वजनिक वाहतूक):**
   **मेट्रो, बस, आणि ट्रेन ही वेळेवर, पर्यावरणपूरक, आणि स्वस्त वाहतूक साधने आहेत.**
2. **कारपूलिंग (गाडी शेअर करणे):**
   **सहकाऱ्यांसोबत गाडी शेअर केल्यास इंधन आणि पैशांची बचत होते.**
3. **किरायाची गाडी:**
   **जर गाडीची गरज कमी वेळेसाठी असेल, तर गाडी भाड्याने घेणे हा चांगला पर्याय आहे.**
4. **इलेक्ट्रिक गाड्या:**
   **कमी प्रदूषण करणाऱ्या इलेक्ट्रिक गाड्या पर्यावरणासाठी फायदेशीर ठरतात.**
5. **सायकलिंग:**
   **कमी अंतरासाठी सायकल वापरल्यास आरोग्यासाठीही चांगले फायदे होतात.**

### गाडी - गरज की चैन?

**चारचाकी गाडी खरेदी हा पूर्णतः वैयक्तिक निर्णय आहे. हा निर्णय घेण्यासाठी वैयक्तिक गरजा, आर्थिक क्षमता, प्रवासाचे अंतर, आणि पर्यावरणीय जबाबदारी या सर्व गोष्टींचा विचार करावा. गाडी गरजेची वाटल्यास तिला एक गुंतवणूक मानावे, मात्र ती अनावश्यक वाटल्यास पर्यायांचा विचार करणे अधिक शहाणपणाचे ठरते. "चारचाकी गाडी असणे तुमचे जीवन सुलभ करेल, पण ती घेतल्यामुळे तुम्हाला आर्थिक, पर्यावरणीय, आणि आरोग्याचे बंधन स्वीकारावे लागेल का?" यावर विचार करून निर्णय घ्यावा!**

## थोडक्यात



### प्री प्रायमरी सेक्शनचे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात संपन्न

पुणे (आरंभ पर्व) : ढोले पाटील एज्यूकेशन सोसायटी,खराडी मधील ढोले पाटील स्कूल फॉर एक्सलेंन्स् प्री प्रायमरी विभागतील वार्षिक स्नेह स्नेहसंमेलन मोठ्या उत्साहात पार पडले.या मध्ये नर्सरी,ज्युनिअर केजी,सिनियर केजी,इयत्ता १ली व इयत्ता २ री मधील विद्यार्थी सहभागी झाले होते.याप्रसंगी नर्सरी,ज्युनिअर केजी,सिनिअर केजी च्या मुलांनी नातेसंबंधाचे महत्व या थिम वर वेगवेगळ्या गाण्यांवर नृत्य सादर केले.तसेच इयत्ता १ली च्या विद्यार्थांनी जीवनात हसणे हे योग्य औषध आहे.या थीम वर वेगवेगळ्या गाण्यावर नृत्य सादर केले तसेच इयत्ता २ री च्या विद्यार्थ्यांनी प्रेरणा या थीमवर वेगवेगळ्या गाण्यावर नृत्य सादर केले. यामधे महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराजांचे बाल रुप सादर करण्यात आले आणि स्वराज्य निर्मितीसाठी मावळ्यांचे योगदान नृत्यातून सादर करण्यात आले.तसेच वडिलां बद्दल कृतज्ञता व्यक्त करणाऱ्या गीतावर नृत्य सादर करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी संस्थेचे चेअरमन सागर ढोले पाटील तसेच संस्थेचे सेक्रेटरी उमा सागर ढोले पाटील,संस्थेचे सर्व मुख्याध्यापक,विभाग प्रमुख,शिक्षक उपस्थित होते. आजच्या या जगात लहान कुटुंबा मुळे नाते संबंध दुरावत चालले आहे.या नात्याचे महत्त्व लहान मुलांच्या मनामध्ये रुजले गेले पाहिजे ते लहान मुलांना सांगितले पाहिजे असे संस्थेचे चेअरमन सागर ढोले पाटील यांनी आपल्या भाषणात सांगितले. प्री प्रायमरी विभागाच्या मुख्याध्यापिका आरुषा मजली यांनी पाहुण्यांची ओळख करून दिली.तसेच मुख्याध्यापिका डॉ. अनुराधा अय्यर यांनी शाळेचा वार्षिक अहवाल सादर केला.

### महाराष्ट्र गंधर्व नाट्यसंगीत स्पर्धा २०२५ येत्या फेब्रुवारीमध्ये

पुणे (आरंभ पर्व) : गेली 13 वर्षे लायन्स क्लब पुणे सहकार नगर व भरत नाट्य मंदिर यांच्या संयुक्तविद्यमाने व गंधर्व महाविद्यालय यांच्या सहकर्याने ही स्पर्धा मराठी नाटकातीलउभारत्या कलाकारांना, गायकांना मदत करण्यासाठी भरवली जाते. या वर्षी ही स्पर्धा रविवार 9 फेब्रुवारी 2025 रोजी भरत नाट्य मंदिर पुणे येथे होणार आहे. स्पर्धा विविध वयोगटात होणार असून या मध्ये 8 ते 15 वर्ष, 16 ते 40 वर्ष, 41 ते 60 वर्ष व 61 अणि पुढील वर्ष असे गट असणार आहेत . यामध्ये प्रथम व द्वितीयक्रमां क्रमांकास रोख पारितोषिक , ट्रॉफी दिली जाणार आहेत व प्रत्येक गटात 3 उत्तेजनार्थ पारितोषिक दिली जाणार आहेत. स्पर्धेसाठी संगीत नाटकातील कामकेलेले मान्यवर परीक्षक म्हणुन उपस्थित राहणार आहेत. स्पर्धेचा बक्षीस वितरण जुन्या काळातील संगीत नाटकातील प्रसिद्ध अभिनेत्री फैयाजयांच्या उपस्थितीत त्याच दिवशी सायंकाळी 5.30 वा भरत नाट्य मंदिर येथे होणार आहे. स्पर्धेतील विजेत्यांना नंतर होणाऱ्या संगीत कार्यशाळेत भाग घेता येणार आहे. या आधी जेष्ठ गायक रामदास कामत, राजीव परांजपे, कीर्ती शिलेदार यांच्याकार्यशाळा झाल्या आहेत. इच्छुक स्पर्धकांनी https://forms.gle/ska7JTvGCJvxs8Ho6 हा गूगल फॉर्मभरावा. तसेच ppr bnsn2024@gmail.com या मेल वर पाठवावा असे आवाहनकरण्यात येत आहे. स्पर्धेच्या अधिक माहिती साठी प्रदीप रत्नपारखी 9423572073 यांच्याशी संपर्क साधावा अशी माहिती स्पर्धेचे संयोजक डॉ प्रसाद खंडागळे व भरतनाट्य मंदिरचे अध्यक्ष पांडुरंग मुखडे यांनी दिली.

### शंभर रुपयांसाठी खून करणाऱ्याला सात वर्ष सक्तमजुरी

पुणे (आरंभ पर्व) : हातउसने दिलेले शंभर रुपये परत मागितल्याने एकाच्या डोक्यात दगड घालून खून करणाऱ्याला सत्र न्यायधीश पी. पी. जाधव यांनी सात वर्ष सक्तमजुरी आणि दहा हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावली. भीमराव यशवंत खांडे (वय ५५, रा. वडकी, खोकेनगर, मूळ रा. गिरवी, ता. फलटण, जि. सातारा) असे शिक्षा सुनावण्यात आलेल्याचे नाव आहे. खांडे याने चंद्रकांत शंकर चव्हाण (वय ६८, रा. पांडवनगर, वडकी, हवेली) यांच्या डोक्यात दगड घालून खून केला होता. खांडे याने चव्हाण यांच्याकडून शंभर रुपये उसने घेतले होते. चव्हाण यांनी पैसे परत मागितले होते. पैसे परत न केल्याने त्यांच्यात १७ एप्रिल २०१५ रोजी वाद झाला. खांडे याने चव्हाण यांच्या डोक्यात दगड घालून खून केला होता. सासवड रस्त्यावर असलेल्या वडकी गावातील एका गोदामाजवळ ही घटना घडली होती.

# सशक्त राजकारण, सशक्त भारताकरीता आठवी युवा संसद पुण्यात

## जाधवर ग्रुप ऑफ इन्स्टिटयूटस्, पुणे तर्फे आयोजन : संसद कट्टा अंतर्गत उपमुख्यमंत्री अजित पवार आणि छगन भुजबळ यांची मुलाखत

**पुणे : लक्ष्मण साबळे (दै. आरंभ पर्व)**

युवा शक्तीला योग्य गती व दिशा देऊन समाजकारण आणि राजकारणामध्ये त्यांचे अधिष्ठान निर्माण करण्याकरीता तसेच सशक्त युवा, सशक्त राजकारण व सशक्त भारताकरीता तरुणाईने पुढाकार घ्यावा, याकरिता पुण्यामध्ये आठव्या युवा संसदेचे आयोजन करण्यात आले आहे. न-हे येथील जाधवर ग्रुप ऑफ इन्स्टिटयूटस्, पुणे तर्फे गुरुवार, दिनांक ३० व शुक्रवार, दिनांक ३१ जानेवारी २०२५ रोजी सकाळी ९ ते सायंकाळी ६ यावेळेत संस्थेच्या सभागृहात ही संसद होणार आहे, अशी माहिती इन्स्टिटयूटचे उपाध्यक्ष व संसदेचे संस्थापक अध्यक्ष ॲड. शार्दुल जाधवर यांनी पत्रकार परिषदेत दिली.




यावर्षी संसद कट्टा अंतर्गत महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार आणि माजी उपमुख्यमंत्री छगन भुजबळ यांचे मुलाखतीचे सत्र होणार आहे. संसदेत मागील वर्षी शिवसेनेचे नेते संजय राऊत यांची मुलाखत झाली होती. माजी कॅबिनेट मंत्री महादेव जानकर, माजी राज्यमंत्री सदाभाऊ खोत, स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे अध्यक्ष राजू शेट्टी, गणराज्य संघाच्या संस्थापक अध्यक्ष सुषमा अंधारे, ज्येष्ठ पत्रकार संजय आवटे, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेचे सदस्य राजेश पांडे, भारतीय छात्र संसदेचे अध्यक्ष राहुल कराड, जाधवर ग्रुप ऑफ इन्स्टिटयूटस्चे अध्यक्ष प्राचार्य डॉ. सुधाकर जाधवर हे संसदेच्या कार्यकारिणीमध्ये आहेत.

संसदेत देशभरातील राजकारण, समाजकारण आणि विविध विषयांतील तज्ज्ञांशी थेट संवाद साधण्याची संधी महाराष्ट्रातील तरुणांना मिळणार आहे. महाराष्ट्रातून सुमारे १५०० हजार विद्यार्थी संसदेत सहभागी होणार आहेत. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, लायन्स क्लब इंटरनॅशनल, रोटरी इंटरनॅशनल यांच्या माध्यमातून अनेक विद्यार्थी संसदेत सहभागी होणार आहेत. पुण्यासह सोलापूर, अकोला, कोल्हापूर, मराठवाडा, कोकण यांसह विविध भागांतून विद्यार्थी संसदेकरीता येणार आहेत.

ॲड.शार्दुल जाधवर म्हणाले, ग्रामसभा ते लोकसभा, राजकारणातील व समाजकारणातील महिलांचा सहभाग, माध्यमे राजकारण घडवतात?, व्हिजन भारत २०२९, सशक्त युवा सशक्त राजकारण सशक्त भारत या विषयांवर संसदेत सत्र होणार आहेत. राजकीय, सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक अशा विविध विषयांवर अनेक मान्यवर आपले विचार मांडणार आहेत. वयवर्षे १६ ते ४० मधील तरुणांनी संसदेत सहभाग घ्यावा. संसदेत सहभागी होण्याकरीता मोफत प्रवेश असून विद्यार्थीनींची एक दिवसाची पुण्यामध्ये राहण्याची आणि जेवणाची सोय करण्यात येणार आहे.

विद्यार्थ्यांनी संसदेतील सहभागाकरीता मो. ९०६७१०९०७५ या क्रमांकावर संपर्क साधावा आणि https://docs.google.com/forms/d/e/1FAIpQLSf6CfpTukLUpQlzJRzogegIQ7jfbUQhEzs1AFL9j3J5miAuYw/viewform या लिंकवरुन फॉर्म भरावा. त्यानुसार विद्यार्थ्यांची नोंदणी होणार आहे. संसदेच्या माध्यमातून युवकांनी राजकारण आणि समाजकारणातील दिग्गजांसोबत संवाद साधावा, हा यामागील मुख्य उद्देश आहे. संसदेकरीता प्रवेश विनामूल्य आहे, तरी तरुणाईने मोठया संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहनही संस्थेतर्फे करण्यात आले आहे.

## ज्ञानज्योती पुरस्काराने कर्तुत्ववान महिलांचा सन्मान



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

साहित्य, कला, प्रशासकीय सेवा, उद्योग, कृषी, क्रीडा आदि क्षेत्रातील महिलांना प्रोत्साहन देऊन त्यांच्या हातून अधिकाधिक चांगले कार्य घडावे, कर्तृत्ववान महिलांचा सन्मान व्हावा, यासोबत बलवान नारी समाज निर्माण व्हावा, या उद्देशाने पुण्यातील मरिमाता मंदिर चॅरिटेबल ट्रस्टच्या वर्धापन दिनानिमित्त 18 जानेवारी 2025 रोजी मराठवाडा मित्र मंडळ, डेक्कन जिमखाना पुणे येथे क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या नावाने कर्तुत्ववान महिलांसाठी राज्यस्तरीय ज्ञानज्योती पुरस्काराचे आयोजन करण्यात आले होते. स्वातंत्र्यपूर्व काळातील स्त्रीला सातत्याने अन्यायाला अत्याचाराला सामोरे जावे लागत असे. त्यावेळी अशा अत्यंत कठोर व प्रतिकूल परिस्थितीमध्ये सावित्रीबाई फुले यांनी महात्मा ज्योतिबा फुले यांच्या बरोबरीने न्यायासाठी लढा दिला. त्यासाठी त्यांनी मुलींसाठी पहिली शाळाही काढली. त्याचाच दूरगामी परिणाम म्हणजे आजच्या काळातील स्त्री ही प्रत्येक क्षेत्रात आत्मविश्वासपूर्वक निर्भयतेने पुढे आलेली दिसते. मरिमाता मंदिर चॅरिटेबल ट्रस्ट तसेच ज्ञानज्योती इन्स्टिट्यूट यांच्या संयुक्त विद्यमाने कार्यक्रमाचे अध्यक्ष कनिष्ठ प्रशासन अधिकारी, शिक्षण विभाग, प्राथमिक, पुणे जिल्हा परिषद, श्री. विठ्ठल कोद्रे यांच्या हस्ते सौ. सिम्मीनाज इम्तियाज मुजावर यांच्यासह सौ. विनया दिनेश शाह, कावेरी विजय वेताळ, अश्विनी आयरेल्लू, भारती परदेशी, मनीषा निंबाळकर, मोहिनी कारंडे, सुनिता हुंबरे, महानंदा डाळिंबे, अश्विनी नायर, एडवोकेट प्रतिभा गवळी आदी 35 कर्तुत्ववान महिलांचा स्मृतिचिन्ह तसेच प्रशस्तीपत्र देऊन सन्मान करण्यात आला.

# सातवी विश्वनाथ स्पोर्ट मिट २४ जानेवारीपासून

**लोणी काळभोर (दै. आरंभ पर्व)**

एमआयटी आर्ट, डिझाईन आणि टॅक्नॉलॉजी विद्यापीठ, विश्वराजबाग लोणी काळभोर येथे ७व्या विश्वनाथ स्पोर्ट मिट २४ ते २९ जानेवारी २०२५ दरम्यान विद्यापीठाच्या क्रीडा संकुलात पार पडणार आहे.

स्पर्धेचे उद्‌घाटन शुक्रवार दि.२४ जानेवारी २०२५ रोजी महाराष्ट्राचे क्रीडा व युवक कल्याण मंत्री दत्तात्रय भरणे यांच्या हस्ते होणार आहे. हा कार्यक्रम माईर्स एमआयटी शिक्षण समुहाचे संस्थापक विश्वधर्मी प्रा. डॉ.विश्वनाथ दा. कराड यांच्या अध्यक्षतेखाली तर राजीव गांधी खेलरत्न व अर्जुन पुरस्कार प्राप्त नेमबाज अंजली भागवत व अर्जुन पुरस्कार विजेते पॅरा अँथलिट सचिन खिलारे (रौप्य पदक विजेता, पॅरिस पॅराऑलिम्पिक स्पर्धा २०२४) विद्यापीठाचे कार्यकारी अध्यक्ष प्रा. डॉ.मंगेश कराड, डॉ.सुनीता कराड यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडणार आहे.

स्पर्धेचा समारोप व बक्षिस वितरण समारंभ विद्यापीठाच्या क्रीडा संकुलात बुधवार दि. २९ जानेवारी रोजी शिरुर-हवेली मतदार संघाचे आमदार ज्ञानेश्वर कटके, ब्रिगेडिअर दिलीप पटवर्धन (निवृत्त) यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे. यंदाच्या स्पर्धेत क्रिकेट (पुरुष), फुटबॉल (महिला व पुरुष), बॅडमिंटन (महिला व पुरुष), बास्केटबॉल (महिला व पुरुष), हॉलीबॉल (महिला व पुरुष), टेबल टेनिस (महिला व पुरुष), कबड्डी, टेनिस (महिला व पुरुष), खो-खो, वॉटर पोलो (महिला व पुरुष), स्विमिंग (महिला व पुरुष), बॉक्सिंग(महिला व पुरुष), रोईंग (महिला व पुरुष), नेमबाजी (महिला व पुरुष), बुद्धीबळ (महिला व पुरुष) इत्यादी खेळांमधून खेळाडूंना जवळपास १० लाखांची बक्षिसे मिळविण्याची संधी आहे.




प्रा. डॉ.विश्वनाथ कराड यांच्या प्रेरणेतून व प्रा. डॉ.मंगेश कराड यांच्या पुढाकाराने राज्यातील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये क्रीडा संस्कृती रुजावी व त्यातून विविध क्रीडाप्रकारांत प्रतिभाशाली खेळाडू तयार व्हावेत यासाठी विश्वनाथ स्पोर्ट मिट या स्पर्धेला सुरुवात करण्यात आली. या स्पर्धेच्या माध्यमातून उपलब्ध होणाऱ्या क्रीडा व्यासपीठाच्या माध्यमातून चांगले खेळाडू तयार करून राज्यासह देशाच्या क्रीडा संस्कृतीत भर घालण्याचा या स्पर्धेचा मुख्य उद्देश आहे.

एमआयटी एडीटी विद्यापीठ, विश्वराजबाग पुणेच्या १५०+ एकरांच्या प्रशस्त व विविध क्रीडा सुविधांनी सुसज्ज अशा कँपसमध्ये 'खेळाच्या माध्यमातून राष्ट्र उभारणी' या ब्रिद वाक्यासह होणाऱ्या व्हीएसएम-७ मध्ये आत्तापर्यंत १३५ हून अधिक शैक्षणिक संस्थांमधील तब्बल ५ हजारांहून अधिक खेळाडूंनी १५ हून अधिक क्रीडा प्रकारांसाठी आपली नावनोंदणी केलेली आहे. या स्पर्धेच्या माध्यमातून पाच दिवस तब्बल १० हजारांहून अधिक खेळाडू व त्यांच्या प्रशिक्षकांचा राबता विद्यापीठाच्या आवारात राहणार आहे. तसेच अद्यापही या स्पर्धेसाठी नाव नोंदणी चालू असून राज्यातील खेळाडूंनी या स्पर्धेत भाग घेऊन विद्यापीठाच्या सुसज्ज क्रीडा सुविधांचा लाभ घ्यावा, असे आवाहन विद्यापीठाचे कुलगुरू तथा स्पर्धा नियोजन समितीचे चेअरमन प्रा. डॉ.राजेश एस., कुलसचिव डॉ.महेश चोपडे, क्रीडा विभागाचे संचालक व शिवछत्रपती पुरस्कार प्राप्त प्रा. पद्माकर फड, विद्यार्थी कल्याण विभागाचे सहाय्यक संचालक डॉ.सुराज भोयार यांनी केले आहे.

> **यंदाच्या विश्वनाथ स्पोर्ट-७ मिटमध्ये १५ हून अधिक क्रीडा प्रकारांमध्ये १३५हून शिक्षण संस्थांमधील ६ हजारांहून अधिक खेळाडू आपली प्रतिभा दाखविणार आहेत. विद्यापीठातील डॉ.विश्वनाथ कराड एमआयटी क्रीडा अकादमीमधील विद्यार्थ्यांसह शिक्षकांनी स्पर्धेच्या तयारीत आघाडी घेतली असून, त्यामुळे स्पर्धेच्या या चार दिवसांत विद्यापीठाचे वातावरण क्रीडा मय होणार आहे.**
> **- प्रा. डॉ. मंगेश कराड कार्यकारी अध्यक्ष, एमआयटी एडीटी विद्यापीठ, पुणे.**

# बीसीएल २०२५ लीग सामन्यांचा रंगतदार खेळ



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पुणे येथे बीसीएल 2025 क्रिकेट लीगचे सामने मोठ्या उत्साहात सुरू आहेत. या लीगमध्ये विविध संघांनी आपल्या दमदार खेळाने प्रेक्षकांचे मन जिंकले आहे. मुठा सह्याद्री शिलेदार आणि नर्मदा रायडर्स यांच्यातील अत्यंत रंगतदार सामन्यात नर्मदा रायडर्सने 3 गडी राखून विजय प्राप्त केला. मिहिर ओक आणि निखिल नसेरी यांनी फलंदाजीचे उत्कृष्ट प्रदर्शन करत संघाच्या विजयात महत्त्वपूर्ण योगदान दिले. याशिवाय, कपिल कुर्लेकरने गोलंदाजीत कमाल करत 4 गडी बाद केले.

कृष्णा लिजेंड्स आणि इंडस सुपर हीरोस यांच्यातील सामन्यात इंडस सुपर हीरोसने 4 गडी राखून विजय मिळवला. ऋत्विक महाजन आणि नचिकेत कुलकर्णी यांच्या शानदार फलंदाजीमुळे इंडस सुपर हीरोसने चांगला खेळ दाखवला. महेश भटने 2.5 षटकांत 8 धावा देऊन 2 गडी बाद केले.

मुठा सह्याद्री शिलेदार आणि कृष्णा लिजेंड्स यांच्यातील सामना अत्यंत थरारक ठरला, जिथे कृष्णा लिजेंड्सने 1 गडी राखून विजय प्राप्त केला. श्रीपाद भागवत आणि वरुण श्रीखंडे यांच्या महत्त्वपूर्ण धावांनी संघाला विजय मिळवला. निखिल नसेरी यांनी गोलंदाजीत अचूकता दाखवत 3 गडी बाद केले.

वशिष्ठी ब्राह्मण युनिटी फाऊंडेशन क्रिकेट क्लब आणि रावी रॉयल ईगल्स यांच्यातील सामन्यात वशिष्ठी ब्राह्मण युनिटी फाऊंडेशनने 3 गडी राखून विजय मिळवला. रावी रॉयल ईगल्सचे अभिषेक कौशिक आणि शैलेश देशपांडे यांच्या शानदार फलंदाजीच्या जोरावर चांगली धावसंख्या मिळाली, मात्र वशिष्ठी ब्राह्मण युनिटी फाऊंडेशनने अखेर विजय मिळवला. तसेच, कुनाल बुटकरने गोलंदाजीत उत्कृष्ट कामगिरी केली.

बियास ब्राव्होज (बीसीएल) आणि ब्रम्हपुत्रा वॉरियर्स यांच्यात झालेल्या सामन्यात ब्रम्हपुत्र वॉरियर्सने 1 गडी राखून विजय मिळवला. गोखले मयूर आणि भूषण परांडकर यांनी उत्कृष्ट फलंदाजी केली, तर पराग चितळे आणि सौरभ मंजरामकर यांच्या गोलंदाजीने सामन्याचा निकाल ठरवला.

शरयु योध्दा आणि इंडस सुपर हीरोस यांच्यातील सामना शरयु योध्दाने 4 गडी राखून जिंकला. मयुरेश चासकर आणि रणजित कुलकर्णी यांच्या शानदार प्रदर्शनाने संघाला विजय मिळवला, आणि रणजित कुलकर्णी आणि ओमकार गोखले यांच्या गोलंदाजीने विरोधकांना पिंजऱ्यात पकडले.

गंगा सुपर किंग्सने ब्रम्हपुत्रा वॉरियर्सवर 5 गडी राखून विजय प्राप्त केला. गौरव गणपुले आणि निखिल जोशी यांच्या शानदार फलंदाजीने संघाला विजय मिळवला, तर गोलंदाजीतील जबरदस्त प्रदर्शनाने गंगा सुपर किंग्सचा विजय निश्चित केला.

## शिखर धवन आणि ओरी यांचा ॲमेझॉन एमएक्स प्लेयरकडून अल्टीमेट ओटीटी 'सुपरहिट जोडी' म्हणून गौरव

# कल्पक ब्रँड कॅम्पेन म्हणून हातमिळवणी

**मुंबई (दै. आरंभ पर्व)**

ॲमेझॉनने अलीकडेच एमएक्स प्लेयरच्या प्रमुख मालमत्तांचे अधिग्रहण केल्यानंतर, अतुलनीय पोहोच आणि प्रचंड कंटेंट लायब्ररीसह भारतातील विनामूल्य करमणुकीची व्याख्या पुन्हा करण्याचे उद्दिष्ट ठेवून ही सेवा सुरू करण्यात आली आहे. या ध्येयाच्या अनुषंगाने, स्ट्रीमिंग सेवेने मागील आठवड्याच्या शेवटी एक रोमांचक कॅम्पेन सुरू केले. ज्यामुळे ॲमेझॉन आणि एमएक्स प्लेयरची जोडी स्ट्रीमिंग स्पेसमधील 'सुपरहिट जोडी' ठरली. या कॅम्पेनच्या माध्यमातून क्रिकेटपटू शिखर धवन आणि सोशल मीडिया सेन्सेशन ऑरी एका विनोदी कॅम्पेनसाठी एकत्र आले.

amazon | MX PLAYER

या कॅम्पेनबद्दल आपले विचार मांडताना, ॲमेझॉन एमएक्स प्लेअरच्या मार्केटिंग, प्रॉडक्ट आणि टेक हेड अरुणा दर्यानानी म्हणाल्या, "आमचे नवीनकोरे कॅम्पेन सर्व भारतीयांना विनामूल्य प्रीमियम गुणवत्तेच्या कंटेंटसाठी ॲमेझॉन एमएक्स प्लेअरचा दृष्टीकोन दर्शवणारे आहे. सुप्रसिद्ध क्रिकेटपटू शिखर धवन आणि सोशल मीडिया सेन्सेशन ऑरी यांना एकत्र आणून, आमचे उद्दिष्ट विशाल कंटेंट निवडीवर प्रकाश टाकण्याचे आहे. देशभरातील प्रेक्षक या मंचावर विनामूल्य आनंद घेऊ शकतील! हे कॅम्पेन उत्तम विनोदनिर्मिती करते. त्याचप्रमाणे उत्तम आशय, नाविन्यपूर्ण मार्केटिंग आणि धोरणात्मक भागीदारी उपलब्ध करण्याची आमची वचनबद्धता प्रतिबिंबित करते."

या कॅम्पेनचा भाग असलेल्या शिखर धवनने सांगितले की, "क्रिकेटप्रमाणेच मनोरंजनात लोकांना एकत्र आणण्याची शक्ती आहे. या कॅम्पेनसाठी ॲमेझॉन एमएक्स प्लेयरशी भागीदारी करणे हा एक परिपूर्ण आनंद होता. 'शिखर x ऑरी' यांचे एकत्रित सादरीकरण म्हणजे ऊर्जा आणि धम्माल मजेचा संचार आहे. ॲमेझॉन एमएक्स प्लेयर लाखो भारतीयांसाठी विनामूल्य करमणुकीची परिभाषा कशाप्रकारे नव्याने रचेल हे पाहणे आश्चर्याचे असेल. या प्रवासाचा भाग होण्यासाठी मी रोमांचित आहे".

यात भर घालत, ऑरीने माहिती दिली, "या कॅम्पेनचा भाग होण्याची संधी म्हणजे माझ्याकरिता मोठा धक्का होता. 'शिखर x ऑरी' स्पॉटसाठी शिखरसोबत माझी जोडी जमणार ही भावना खरोखरच मजेदार वाटली.



## ग्रामपंचायत पिंपळगाव तर्फे खेड, ता. खेड, जि. पुणे.

### खुली निविदा सूचना क्र.- ५/२०२४-२०२५

ग्रामपंचायत मौजे पिंपळगाव तर्फे खेड, ता. खेड, जि.पुणे यांच्यातर्फे योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदार यांच्याकडून दोन पाकीट सीलबंद लिफाफा पद्धतीने खालील कामांची निविदा मागविण्यात येत आहे.

कोऱ्या निविदांचा नमुना ग्रामपंचायत कार्यालय पिंपळगाव तर्फे खेड येथे दि. २१/०१/२०२५ ते दि. ०३/०२/२०२५ पर्यंत कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी सकाळी १० ते ०५ या वेळेत देण्यात येतील. व कंत्राटदार यांच्याकडून पाठवण्यात आलेल्या सीलबंद निविदा दि. २१/०१/२०२५ रोजी सकाळी ११ ते दि. ०३/०२/२०२५ रोजी सायंकाळी ०५ वाजेपर्यंत कार्यालयीन वेळेत स्वीकारण्यात येतील. सदर निविदा येणाऱ्या पिंपळगाव तर्फे खेड ग्रामपंचायतीच्या मासिक सभेमध्ये उघडण्यात येतील.

| अ. क्र. | कामाचे नाव | निविदा रक्कम रू. | इसारा रक्कम | निविदा फी | कामाचा कालावधी | निधीचा प्रकार |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | पिंपळगाव तर्फे खेड येथील आंबेडकर नगर येथे अंतर्गत रस्ता काम करणे. | ९९९६३६/- | १% (रूपये १००००/-) | ५९०/- | चार महिने | नवबौद्ध घटकांचे विकास करणे - २०२३-२४ |

टीप : १) कोऱ्या निविदा नमुन्याची फी ग्रामपंचायत पिंपळगाव तर्फे खेड, ता. खेड, जि.पुणे येथील कार्यालयात फी भरून निविदा उपलब्ध करून घ्यावी.२) ठेकेदाराने कोऱ्या निविदा मागणी अर्जासोबत नोंदणी अर्जासोबत नोंदणी प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. ३) ठेकेदार यांनी कंत्राटदार नोंदणी प्रमाणपत्र, पॅनकार्ड, तीन वर्षांचे इन्कमटॅक्स रिटर्न (२०२१/२२,२०२२/२३ व २०२३/२४), जीएसटी रजिस्ट्रेशन प्रमाणपत्र, अनुभव दाखला दस्तऐवज लिफाफा क्रमांक १ (तांत्रिक लिफाफा) मध्ये जोडणे आवश्यक / बंधनकारक आहे. लिफाफा क्रमांक १ (तांत्रिक लिफाफा) मध्ये आवश्यक दस्तऐवजाची सूची नसलेस लिफाफा क्रमांक २ (आर्थिक / व्यापारी लिफाफा) उघडला जाणार आहे. लिफाफा क्रमांक २ मध्ये वरील कामाचा १% इसारा रकमेचा म्हणजेच रुपये १०,०००/- (रु. दहा हजार मात्र) चा धनाकर्ष अथवा धनादेश ग्रामपंचायत शेलपिंपळगाव, ता. खेड, जि. पुणे चे नावाने जोडणे आवश्यक आहे. ४) कोऱ्या निविदा तांत्रिक लिफाफ्यामध्ये द्यावयाचा तपशील निविदा खरेदी सोबत द्यावयाचा आहे. ५) सदरचे कामाबाबत मा. उपअभियंता बांधकाम, जिल्हा परिषद उपविभाग पंचायत समिती खेड, पुणे यांचे सूचना बंधनकारक राहतील.६) कोणतेही कारण न देता कोणतीही एक निविदा अथवा सर्वच निविदा नाकारण्याचा अधिकार हक्क ग्रामपंचायत पिंपळगाव तर्फे खेड, ता. खेड, जि. पुणे यांनी राखून ठेवलेला आहे.

सही/-
ग्रामपंचायत अधिकारी,
ग्रामपंचायत पिंपळगाव तर्फे खेड, ता. खेड, जि. पुणे.

सही/-
सरपंच,
ग्रामपंचायत पिंपळगाव तर्फे खेड, ता. खेड, जि. पुणे.

# भारती एअरटेल आणि बजाज फायनान्स यांच्यात धोरणात्मक भागीदारी

- वित्तीय सेवांसाठी भारतातील सर्वात मोठ्या डिजिटल प्लॅटफॉर्मपैकी एक तयार करणार
- एक अशी अनोखी भागीदारी जी वित्तीय सेवांच्या शेवटच्या टप्प्यातील वितरणात बदल घडवून आणणार असून डिजिटल समावेशनाला प्रोत्साहन देणार आहे
- एअरटेल आपल्या सर्व 370 मिलियन ग्राहकांना बजाज फायनान्सच्या बहुतांश किरकोळ वित्तीय ऑफर्स हळूहळू देऊ करणार आहे
- ही भागीदारी एअरटेलचे सामर्थ्यवान डिजिटल प्लॅटफॉर्म्स आणि सर्वव्यापी माध्यमांच्या (ओम्नी चॅनल्स) क्षमता व बजाज फायनान्सच्या 27 उत्पादन श्रेणी, एआय-प्रेरित धोरण आणि भक्कम हमीच्या (अंडररायटिंग) सामर्थ्यांच्या वैविध्यपूर्ण संच यांचा संयोग साधते.

**नवी दिल्ली/मुंबई (दै. आरंभ पर्व)**

भारती एअरटेल ही भारतातील सर्वात मोठ्या दूरसंचार सेवा पुरवठादारांपैकी एक आहे आणि बजाज फायनान्स ही देशातील सर्वात मोठी खाजगी क्षेत्रातील बिगर बँकिंग वित्तीय कंपनी (एनबीएफसी) आहे. या दोघांनी वित्तीय सेवांसाठी भारतातील सर्वात मोठे डिजिटल प्लॅटफॉर्म तयार करण्यासाठी आणि शेवटच्या टप्प्यातील वितरणात बदल करण्यासाठी एक धोरणात्मक भागीदारी करण्याचे जाहीर केले आहे.

या अनोख्या भागीदारीमुळे एअरटेलचे 370 मिलियन, 12 लाख+ भक्कम वितरण नेटवर्क आणि बजाज फायनान्सचे 27 उत्पादन श्रेणींचे वैविध्यपूर्ण समूह आणि 5,000+ शाखा आणि 70,000 फील्ड एजंट्सचे वितरण प्रभाव एकत्र येत आहेत. एअरटेल सुरुवातीला आपल्या एअरटेल थँक्स ॲपवर बजाज फायनान्सची किरकोळ वित्तीय उत्पादने सुलभ व सुरक्षित ग्राहक अनुभवासाठी देऊ करणार आहे आणि नंतर स्टोअर्सच्या देशव्यापी नेटवर्कद्वारे प्रदान करणार आहे. वित्तीय उत्पादने आणि सेवांमध्ये लक्षणीय वाढ करणे कंपन्यांच्या डिजिटल मालमत्तेच्या एकत्रित सामर्थ्यामुळे एअरटेल व बजाज फायनान्सला शक्य होणार आहे.

आतापर्यंत बजाज फायनान्सची दोन उत्पादने एअरटेल थँक्स ॲपवर प्रयोगात्मक दृष्टीने देण्यात आली आहेत. मार्चपर्यंत बजाज फायनान्सची चार उत्पादने एअरटेल थँक्स ॲपवर ग्राहकांना उपलब्ध होतील. यामध्ये गोल्ड लोन, बिझनेस लोन, को-ब्रँडेड इन्स्टा ईएमआय कार्ड आणि पर्सनल लोनचा समावेश आहे. बजाज फायनान्सची जवळपास 10 आर्थिक उत्पादने या कॅलेंडर वर्षात एअरटेल द्वारे हळूहळू सादर केली जाणार आहेत. एअरटेल ग्राहकांना एअरटेल-बजाज फिनसर्व्ह इन्स्टा ईएमआय कार्डसाठी एअरटेल थँक्स ॲपद्वारे आणि नंतर आपल्या देशव्यापी स्टोअर नेटवर्कद्वारे अर्ज करण्याची संधी मिळते. बजाज फायनान्स ग्राहकांना एअरटेल-बजाज फिनसर्व्ह ईएमआय कार्डवर विविध ऑफर्स उपलब्ध आहेत. 4,000 हून अधिक शहरांमधील 1.5 लाखांहून अधिक भागीदार स्टोअर्स मध्ये इलेक्ट्रॉनिक्स, फर्निचर आणि किराणा यांच्यासह विविध वस्तूंच्या खरेदीसाठी लवचिक ईएमआय पर्याय आणि पेमेंट प्लॅनसचा लाभ वापरकर्त्यांना उचलता येणार आहे. याव्यतिरिक्त, को-ब्रँडेड कार्ड अनेक प्लॅटफॉर्मवरील ई-कॉमर्स व्यवहारांसाठी लागू आहे. एअरटेल थँक्स ॲपमुळे आता ग्राहकांना गोल्ड लोन मिळविता येईल आणि त्यायोगे क्रेडिटच्या बाबतीत नवीन ग्राहकांना वित्तचा वापर करता येईल आणि औपचारिक वित्तीय प्रणालीशी एकरूप होता येईल. भागीदारीचा एक भाग म्हणून, भक्कम नियामक अनुपालन, डेटा गोपनीयता आणि सुरक्षा व सुलभ ग्राहक सेवेची बांधिलकी या दोन्ही कंपन्यांनी स्वीकारलेली आहे.

गोपाल वित्तल, उपाध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक, भारती एअरटेल म्हणाले, "एअरटेल आणि बजाज फायनान्स या देशातील दोन विश्वासार्ह कंपन्या आहेत आणि कोट्यवधी भारतीयांना विविध प्रकारच्या आर्थिक गरजा असलेला पोर्टफोलिओ देऊन सबल करण्याची सामायिक दृष्टी त्यांनी ठेवलेली आहे. दोन्ही कंपन्यांची एकत्रित पोहोच, प्रमाण आणि वितरण शक्ती या भागीदारीचा पाया म्हणून काम करणार आहे व आम्हाला बाजारपेठेत सफलता गाठण्यास मदत करणार आहे. आम्ही एअरटेल फायनान्सला समूहासाठी धोरणात्मक मालमत्ता म्हणून तयार करीत आहोत आणि व्यवसायात गुंतवणूक आणि वाढ करत राहू. आज आमच्यावर 1 मिलियन पेक्षा जास्त ग्राहक विश्वास ठेवत असून एअरटेल फायनान्सला आमच्या ग्राहकांच्या सर्व आर्थिक गरजा पूर्ण करण्यासाठी वन-स्टॉप शॉप बनविण्याचे ध्येय आम्ही ठेवले आहे."

राजीव जैन, व्यवस्थापकीय संचालक, बजाज फायनान्स म्हणाले, "डेटावर आधारित क्रेडिट हमी (अंडररायटिंग) आणि वित्तीय समावेशनाच्या केंद्रस्थानी भारतातील डिजिटल परिस्थितीक व्यवस्था आहे. एअरटेल बरोबरची आमची भागीदारी सर्वसमावेशक विकासासाठी भारताच्या डिजिटल पायाभूत सुविधांचा फायदा तर घेतेच आणि त्याचसोबत भारतातील दोन आघाडीच्या आणि सर्वात विश्वासार्ह ब्रँड्सचे कौशल्य आणि पोहोच यांचा सुद्धा संयोग साधते. एअरटेल सोबत एकत्र काम करून आम्ही भारताचा पसंतीचा वित्तदाता बनू इच्छितो आणि दुर्गम भागातही लाखो लोकांना वित्तीय सेवांचा लाभ घेण्यास समर्थ बनवू इच्छितो. आम्ही अशा वेळी एअरटेलशी हातमिळवणी करण्यास उत्सुक आहोत जेव्हा बजाज फायनान्स एआयच्या शक्तीचा वापर करून कार्यक्षमता वाढवित आहे आणि ग्राहकांचा अनुभव वाढवित आहे."

## थोडक्यात



### पुणे : सन्मती बाल निकेतन तर्फे स्वच्छता अभियान

पुणे (आरंभ पर्व) : पद्मश्री डॉ. सौ. सिंधुताई सपकाळ (माई) यांच्या सन्मती बाल निकेतन, मांजरी,येथील मुलांनी आज एक आगळे - वेगळे असे " पद्मश्री महर्षी डॉ. सौ. सिंधुताई सपकाळ माई स्वच्छता अभियान "राबवून परिसर स्वच्छतेचा संदेश दिला. संस्थेच्या आजूबाजूचा परिसर स्वच्छ करत, हातात खराटा घेऊन मुलांनी "माझा परिसर स्वच्छ ठेवणे, माझी जबाबदारी" हे ब्रीदवाक्य प्रत्यक्षात आणले. "जानेवारी २०२५ पासून सुरू झालेले हे अभियान दर १५ दिवसांनी नियमितपणे राबवले जाईल." या अभियानाद्वारे परिसर स्वच्छ ठेवण्याबरोबरच समाजात स्वच्छतेबाबत जागरूकता निर्माण करण्याचा संस्थेचा हेतू आहे. अशी माहिती माईंच्या कन्या व संस्थेच्या अध्यक्षा ममता सिंधुताई सपकाळ यांनी दिली. या स्वच्छता अभियानादरम्यान विद्यार्थ्यांनी "माईंच्या लेकरांचा निश्चय आगळा, स्वच्छ ठेवणार परिसर सगळा!", "माईंची लेकरं एकदम भारी, परिसर सगळा स्वच्छ करी!", "जिथे स्वच्छता, तिथे आरोग्य!", "एक पाऊल स्वच्छतेकडे!" अशा घोषवाक्यांद्वारे स्वच्छतेचा संदेश दिला: मुलांनी स्वच्छतेचा संदेश देत समाजासाठी प्रेरणादायी उदाहरण निर्माण केले आहे. "स्वच्छ परिसर, निरोगी जीवन" या उद्देशाने राबविण्यात आलेले हे अभियान भविष्यातील अनेक उपक्रमांची सुरुवात ठरेल, अशी आशा संस्थेच्या वतीने व्यक्त करण्यात आली.



### मंगळवार पेठेत काची वस्तीतील घराला आग; ज्येष्ठ महिला बचावली

पुणे (आरंभ पर्व) : मंगळवार पेठेतील काची वस्तीत असलेल्या एका घराला सोमवारी दुपारी आग लागली. अग्निशमन दलाच्या जवानांनी घटनास्थळी धाव घेऊन आग आटोक्यात आणली. आगीत गृहोपयोगी साहित्य जळाले. सुदैवाने या घटनेत कोणी जखमी झाले नाही. मंगळवार पेठेतील एसएसपीएम प्रशालेच्या पाठीमागील बाजूस काची वस्ती आहे. या वसाहतीत बैठी पत्र्यांची घरे आहे. सोमवारी दुपारी पावणेएकच्या सुमारास घरातून मोठ्या प्रमाणावर धूर येत होता. घरात चव्हाण कुटुंबीय राहायला आहेत. घरात कोणी नव्हते. चव्हाण यांची आजी घराबाहेर बसल्या होत्या. वस्तीतील रहिवाशांनी काही अंतरावर असलेल्या अग्निशमन दलाच्या नायडू केंद्रात या घटनेची माहिती दिली. त्यानंतर अग्निशमन दलाचा बंब दोन मिनिटात तेथे पोहोचला. अग्निशमन दलाचे तांडेल रऊफ शेख, गणेश पराते, वैष्णव गाडे, दीपक क्षीरसागर, हिरामण मोरे यांनी पाण्याचा मारा करुन आग आटेक्यात आणली. जवानांनी पाच मिनिटात आग आटोक्यात आणली. घरात कोणी नसल्याने दुर्घटना टळली. आगीत गृहोपयोगी साहित्य आणि छताचे पत्रे जळाले. जवानांनी घरातून एक छोटा सिलिंडर बाहेर काढला. आगीमागचे कारण समजू शकले नाही, अशी माहिती अग्निशमन दलातील तांडेल रऊफ शेख यांनी दिली.

## भरधाव बसची पादचारी ज्येष्ठ दाम्पत्याला धडक

### बसच्या धडकेत ज्येष्ठाचा मृत्यू




**पुणे (दै. आरंभ पर्व)**

भरधाव बसने पादचारी ज्येष्ठ दाम्पत्याला धडक दिल्याची घटना पुणे-सोलापूर रस्त्यावरील शेवाळवाडी परिसरात घडली. अपघातात पादचारी ज्येष्ठ नागरिकाचा मृत्यू झाला. याप्रकरणी हडपसर पोलिसांनी बस चालकाविरुद्ध गुन्हा दाखल केला.

जयंत भामरे (वय ६३, रा. ग्रीनवुड्स, मांजरी, हडपसर) असे मृत्युमुखी पडलेल्या ज्येष्ठ नागरिकाचे नाव आहे. अपघातात भामरे यांची पत्नी वैशाली गंभीर जखमी झाल्या असून, त्यांच्यावर खासगी रुग्णालयात उपचार सुरू असल्याची माहिती पोलिसांनी दिली. याबाबत भामरे यांची मुलगी प्रियांका (वय २८) यांनी हडपसर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, बस चालक संजय उज्जैनराव दिंडे (वय ४६, रा. संतकृपा सोसायटी, चिखली) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, भामरे दाम्पत्य शनिवारी सायंकाळी पावणेसातच्या सुमारास पुणे-सोलापूर रस्त्यावरुन निघाले होते. शेवाळवाडी भाजी मंडईजवळ रस्ता ओलांडणाऱ्या भामरे दाम्पत्याला भरधाव बसने धडक दिली. अपघातात जयंत आणि त्यांची पत्नी वैशाली जखमी झाल्या.

या घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. दोघांना तातडीने खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले. उपचारांपूर्वीच जयंत यांचा मृत्यू झाला होता. पोलीस उपनिरीक्षक अशोक गांधले तपास करत आहेत.

## अपघातात कल्याणचे तीन जण ठार

**नाशिक (दै. आरंभ पर्व)**

इगतपुरी तालुक्यात घोटी-सिन्नर राज्य महामार्गावर सोमवारी सायंकाळी रिक्षा आणि कंटेनरची समोरासमोर धडक होऊन तीन जणांचा मृत्यू तर, दोन जण जखमी झाले. मृतांमध्ये कल्याण येथील चार वर्षीय बालिकेसह तिच्या वडिलांचा समावेश आहे. तर बालिकेची आई आणि अन्य नातेवाईक जखमी आहेत.

महामार्गावरील एसएमबीटी रुग्णालयाजवळ हा अपघात झाला. कल्याण येथील रिक्षाचालक अमोल घुगे हे कुटूंबिय आणि नातेवाईकांना घेऊन रिक्षाने शिर्डीकडे निघाले होते. सायंकाळी घोटी-सिन्नर रस्त्यावर एका वाहनाला मागे टाकून पुढे जाण्याच्या प्रयत्नात त्यांची रिक्षा समोरून येणाऱ्या कंटेनरला धडकली. या अपघातात रिक्षाचालक अमोल विनायक घुगे (२५, नांदवली, कल्याण) यांचा जागीच मृत्यू झाला. तर त्यांची मुलगी स्वरा घुगे (चार), मार्तंड आव्हाड (६०) यांचा रुग्णालयात मृत्यू झाला.

रिक्षाचालक घुगे यांची पत्नी प्रतीक्षा घुगे (२२), कलावती आव्हाड (५८, कल्याण) हे गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर एसएमबीटी रुग्णालयात उपचार सुरु आहेत. अपघाताची माहिती मिळताच महामार्ग सुरक्षा पथकाचे सहायक पोलीस निरीक्षक राम व्होंडे यांनी घटनास्थळी धाव घेतली. जखमींना एसएमबीटीच्या रुग्णवाहिकेतून रुग्णालयात दाखल करण्यात आले.




कंटेनर चालक राहुल कुमार प्रजापती (२८, झारखंड) याला पोलिसांनी ताब्यात घेतले. ज्या ठिकाणी अपघात झाला ते अपघातप्रवण क्षेत्र नाही. हा अपघात रिक्षाचे टायर फुटल्यामुळे वा पुढील वाहनापुढे जाण्याचा प्रयत्न केल्यामुळे झाला असल्याची शक्यता वर्तविली जात आहे. अपघातग्रस्त वाहने बाजूला करून वाहतूक सुरळीत करण्यात आली. या प्रकरणी वाडिवऱ्हे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

# जेव्हा 'तो' धडावेगळं केलेलं शीर हातात घेऊन फिरला होता

### त्या प्रकरणाचं नेमकं काय झालं?

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

९ ऑक्टोबर २०१५ ची सकाळ उजाडली ती पुण्यातल्या कात्रज भागात असलेल्या सुखसागर नगर भागाला हादरवणारी ठरली. कारण एक वृद्ध माणूस त्याच्या पत्नीचं कापलेलं शीर घेऊन आणि दुसऱ्या हाती कुऱ्हाड घेऊन रस्त्यावरुन फिरत होता. हा प्रकार पाहून अनेक लोक घाबरले तसंच काहींनी पोलिसांना याबाबत फोनवरुन माहिती दिली. काही लोकांनी या माणसाचे फोटोही काढले. एका माणसाच्या हाती त्याच्या पत्नीचं शीर आहे आणि दुसऱ्या हातात कुऱ्हाड आहे हा व्हिडीओ सोशल मीडियावरही व्हायरल झाला. या प्रकरणाचं नेमकं काय झालं? आपण जाणून घेणार आहोत. हातात पत्नीचं धडावेगळं केलेलं शीर घेऊन फिरणाऱ्या वृद्धाचं नाव रामचंद्र चव्हाण असं होतं. मोटरसायकलवरुन जाणाऱ्या एका माणसाने त्यांना पाहिलं आणि त्याने या धक्कादायक घटनेची माहिती पुढच्या चौकात असलेल्या वाहतूक पोलिसाला दिली. व्ही. के. कुमार, डी. एन. जगताप आणि भालचंद्र तन्वर हे तिघेही वाहतूक पोलीस या ठिकाणी पोहचले. सहाय्यक पोलीस निरीक्षक संजय चव्हाण आणि पोलीस हवालदार राहुल कदम तसंच मुकंद पवार हेदेखील घटनास्थळी पोहचले. पोलिसांनी या प्रकरणात वृद्ध आरोपी रामचंद्र चव्हाणला अटक केली. त्याच्या हातात असलेलं त्याच्या पत्नीचं शीर आणि कुऱ्हाड हे दोन्ही ताब्यात घेतलं. पोलिसांनी या वृद्धाला म्हणजेच रामचंद्र चव्हाणला पोलीस भारती विद्यापीठ पोलीस ठाण्यात नेलं. त्यानंतर त्यांनी त्याच्या पत्नीचा मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठवला. पोलिसांनी जेव्हा या वृद्धाची चौकशी केली तेव्हा त्याने त्याचं नाव रामचंद्र शेऊ चव्हाण असल्यचं सांगितलं. तसंच माझ्या हातात माझी पत्नी सोनाबाई चव्हाणचं शीर होतं असंही सांगितलं. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार रामचंद्र चव्हाण हा मूळचा गुलबर्गा या ठिकाणी राहणारा होता. मात्र ४० वर्षांपूर्वी तो पुण्यात आला आणि इथेच वास्तव्य करु लागला. सुखसागर नगर या ठिकाणी असलेल्या गंगा ओसियन पार्क या इमारतीत तो वॉचमनचं काम करत होता. तसंच या ठिकाणी असलेल्या एका घरात तो पत्नीसह राहात होता. त्याची मुलं राजेश, उमेश आणि सून सुनीता तसंच दोन नातू असं कुटुंबही त्याच्याच बरोबर होतं. त्याच्या दोन्ही मुलींची लग्न झाली आहेत. त्या दोघीही पुण्याच्या बाहेर राहतात.



### जानेवारी २०१६ मध्ये काय घडलं?

जानेवारी २०१६ मध्ये पोलिसांनी या प्रकरणातली चार्जशीट पुण्यातल्या मॅजिस्ट्रेट कोर्टासमोर ठेवली. तसंच पोलिसांनी रामचंद्रच्या पत्नीचा म्हणजेच सोनाबाईंचा शवविच्छेदन अहवालही सादर केला. सोनाबाईंच्या शरीरावर २६ वार होते. तसंच नंतर तिचं शीर धडावेगळं कऱण्यात आलं होतं असं या अहवालात नमूद आहे. रामचंद्र चव्हाणने कोर्टाला सांगितलं की ही हत्या त्याने केली नाही. मात्र न्यायलायने त्याला तुरुंगातच ठेवलं आहे. दरम्यान या प्रकरणात बचाव पक्षाचे वकील म्हणाले की अद्यापही हे प्रकरण न्यायलायत प्रलंबित आहे. आम्ही २० हून साक्षीदारांच्या साक्षी नोंदवल्या आहेत. अद्याप पोलिसांचे साक्षीदार तपासणं बाकी आहे.

### रामचंद्रने पत्नी सोनाबाईची हत्या का केली?

आपल्या पत्नीचे नातेवाईकांपैकी कुणाबरोबर तरी अनैतिक संबंध आहेत असा संशय रामचंद्र चव्हाण यांना होता. यावरुन त्यांच्यात खटके उडत होते. ज्यादिवशी सोनाबाईंची हत्या झाली त्यादिवशीही या दोघांचं भांडण झालं होतं. यावेळी त्यांची मुलं कामावर गेली होती. या दोघांचं भांडण जेव्हा विकोपाला गेलं त्यानंतर रामचंद्रने त्याच्या सुनेला आणि नातवांना एका खोलीत बंद केलं आणि कुलूप लावलं. त्यानंतर कुऱ्हाडीने सोनाबाईवर वार केले आणि त्यांचं शीर धडावेगळं केलं. त्यानंतर रामचंद्र चव्हाणने ते शीर आणि कुऱ्हाड हाती घेतलं आणि तो रस्त्यावरुन चालू लागला ज्यानंतर हा सगळा प्रकार समोर आला अशी माहिती पोलिसांनी दिली.

### ३०२ आणि ४९८ या कलमांखाली अटक

रामचंद्र चव्हाणला कलम ३०२ च्या अंतर्गत अटक करण्यात आली. कलम ४९८ च्या अंतर्गतही गुन्हा नोंदवण्यात आला. या प्रकरणात सुनेने दिलेल्या जबाबानंतर FIR दाखल करण्यात आली. पोलिसांनी या प्रकरणात रामचंद्र चव्हाणच्या कुटुंबातील सदस्यांचे जबाब नोंदवले. ज्यांनी रामचंद्रला पत्नीचं शीर हाती घेऊन जाताना पाहिलं होतं त्या प्रत्यक्षदर्शी लोकांचेही जबाब नोंदवले. रामचंद्र चव्हाणची कुठलीही गुन्हेगारी पार्श्वभूमी नव्हती असं पोलिसांनी स्पष्ट केलं. त्याने रागाच्या भरात पत्नीची हत्या केली असा आरोप आहे. जेव्हा रामचंद्र चव्हाणला पोलिसांनी न्यायालयात हजर करण्यासाठी नेलं होतं तेव्हा महिलांच्या जमावाने त्याच्यावर हल्ला केला होता. त्यानंतर पोलिसांनी रामचंद्र चव्हाणला सुरक्षित स्थळी हलवलं होतं.

दैनिक आरंभ पर्व हे मालक, मुद्रक, प्रकाशक सुरेखा देवेंद्र मते यांनी श्रीराम आर्ट्स अँड प्रिंटिंग प्रेस मिळकत नं. 496, भाजी मंडई समोर, सिंहगड रोड, खडकवासला, हवेली, पुणे-411024 येथे छापून भाजी मंडल समोर, सिंहगड रोड, पुणे 411024 येथे प्रकाशित केले.
संपादक : सुरेखा देवेंद्र मते (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) प्रसिद्ध झालेल्या वृत्त व लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही, न्यायालयीन क्षेत्र पुणे बंधनकारक : Email : aparvinfo@gmail.com

• ARAMBHA PARVA is a daily Newspaper, Printed, Published and Owned by Surekha Devendra Mate • Printed at Shreeram Arts and Printing Press Milkat No. 496, Bhaji Mandai Samor, Sinhagad Road, Khadakwasala, Haveli, Pune-411024 and Published at Opp. Baji Mandal, Sinhgad Road, Pune -411024. • Mobile No-7276314142 • Editor -Surekha Devendra Mate, (responsible for editorial content as per PRB Act) • E-mail-aparvinfo@gmail.com • Newspaper Legal Cases Will Be Settled in Pune Court.